ग्रामस्वच्छता व संत गाडगे बाबांच्या कीर्तनाचा संवाद शास्त्रीय अभ्यास

(कालखंडः सन १९४०-१९४५)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र संकुला अंतर्गत माध्यमशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

गिमेकर मनोजकुमार पंढरीनाथ

एम.ए.ए.सी.ॲन्ड जे.एम.फील.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दीपक शिंदे

संचालक

माध्यमशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

जुन २०२०

<u>ग्रामस्वच्छता व संत गाडगे बाबांच्या कीर्तनाचा संवाद शास्त्रीय अभ्यास</u>

प्रस्तावनाः

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. येथे दुसरे काही पिकत नाही. पण संताची वाणी मात्र अमाप पिकते. ही संताची परंपरा गेली सात शतके महाराष्ट्रात आखंडित चालू आहे. लोकोद्वाराचे महान मंदिर संतानीच या महाराष्ट्रात उभारले. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेवांनी त्यांच्या भिंती बांधल्या. एकनाथंनी त्यावर घुमट चाढवला. तुकोबा त्यांचे कळस झाले आणि गाडगे बाबांनी त्या कळसावर पताका फडकविली !

महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ जनाबाई, तुकडोजी असे अनेक संत होवून गेले आणि त्यांनी आपले विचार किर्तनाच्या माध्यमातून जनतेपर्यत पोहचविले. कीर्तनाची ही परंपरा वैदिक काळापासून भक्ती प्रकार म्हणुन सुरु आहे. भारतीय अग्निपुराणात किर्तनाला देवालय, जातक मालेत प्रसाद, भारतीय संस्कृती कोषात स्तुतीस्त्रोत, मराठी विश्वकोषात दक्षिणात्य गानप्रकार, अशा वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. महाराष्ट्राच्या लोकसंचितात मात्र किर्तनाला एक सांस्कृतिक संस्था म्हणुन मान्यता मिळालेली आहे. कारण कीर्तन हे धर्मप्रसाराचे साधन आहे. महाराष्ट्राच्या लोकसंचितात किर्तनाच्या तीन परंपरा आहेत.

१) अभिजनवादी नारदीय कीर्तन परंपरा
२) सांप्रदायिक वारकरी कीर्तन परंपरा
३) बहुजनवादी गाडगे बाबा कीर्तन परंपरा.

गाडगे बाबांची बहुनवादी संवादी किर्तन परंपरा ही थोर समाजसुधारक आणि लोक परंपरेतील अग्रणी मार्गदर्शक संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांनी समाज प्रबोधनासाठी सुरु केलेली लोकधारणेतील लेखणें जगातल प्रत्येक पोर आपलं म्हणणे, कुटूंबाचा घटक मानुण ही विश्वासात्मक दृष्टीच नव्हे काय? ती गाडगे बाबांच्या समतेतुन येते.

देवाला दारु, माणसांना दारु, रेडे बोकडांच्या कंदोरी शिवाय देवाची शांती नाही. आणि धर्माची भुक भागत नाही. भजन किर्तनाचा थाट केवळ मनाच्या विरंगुळ्यासाठी नाही. याबद्दल बाबांनी कडाडून हल्ला केला. धर्माच्या नावांवर होणा-या हिंसा बंदीचे कार्य भारतात मोठ्या प्रमाणावर संत गाडगे बाबांनीच केले. महाराष्ट्रात भरणा-या बहुतेक ग्रामीण यात्रेतून देवाच्या नावावर होणारी हिंसा बंद करण्यासाठी प्रबोधन केले. आपल्या निर्भीड व सडेतोड वाणीने लोकांना उपदेश करीत या कार्यात अनेक ठिकाणी जीवावरही बेतले. पण त्यांची गाडगे बाबांनी कधीच पर्वा केली नाही.

परंपरेच्या ठराविक चाकोरीबाहेरचे नव्या विचारांचे तत्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवणे फार मोठे कठीण काम मोठमोठ्या धर्म पंथ संस्थापकांना ही जमले नाही ते काम गाडगे बाबांनी केले.

<u>संत गाडगे बाबांचा जीवन परिचय</u>

संत गाडगे बाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्हयातील शेंणगांव येथे झाला. संत गाडगे बाबा हे महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे बांबाची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधारक आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे.

संत गाडगे महाराजांच पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी राणोजी जाणोरकर तर आईचे नाव सखुबाई झिंगराजी जानोरकर हे होते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले प्रसिद्ध समाजसुधारक होते. दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपलं संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे गाडगेबाबा हे संता मधील सुधारक आणि सुधारकां मधील संत होते. त्यांच कीर्तन म्हणजे लोक प्रबोधनाचा एक भाग असे. आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा रूढी परंपरा यावर ते टीका

करत. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण गाडगेबाबा देत. गाडगेबाबा म्हणजे एक चालती-बोलती पाठशाळा होती.

गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. ‘ मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही’ असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा (प्रामुख्याने व-हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला.

‘देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे.’ असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत गाडगे महाराजविषयी माहिती. गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. त्यांचे बालपन आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी राखायला त्यांना फार आवडे.त्यांचे वडिल झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडिल दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे डेबूजींचे. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे ‘सर्व जनांनी’ एकवटून केली पाहिजेत हा धडा त्यांनी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी, १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ

बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना ‘गाडगेबाबा’ म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. . महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत ‘ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस’ असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे - ‘या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली’- असे म्हटले जाते. ‘महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ’, असे यथार्थ उदगार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावती जवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. ‘गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला’ या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. . अमरावती विद्यापीठाला गाडगे बाबांचे नाव देऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नामकरण करण्यात आलेले आहे. "संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश " गाडगेबाबा प्रबोधन काव्य भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू रोगी यांना = औषधोपचार, बेकारांना = रोजगार, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत, गोरगरिबांना = शिक्षण, हाच आजचा रोकडा धर्म आहे ! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे. संत गाडगे बाबांनी कीर्तनाद्वारे आपले लोकशिक्षणाचे कार्य ऋणमोचन (विदर्भ) या गावापासून सुरू केले. ऋणमोचन येथे त्यांनी 'लक्ष्मीनारायणाचे' मंदिर बांधले. १९०८ मध्ये पूर्णा नदीवर घाट बांधून घेतला. १९२५- मुर्तिजापूर येथे गोरक्षण कार्य केले आणि धर्मशाळा व विद्यालय

बांधले. १९१७- पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाला बांधली. फेब्रुवारी ८, इ.स. १९५२ रोजी 'श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंथा व धर्मशाळा स्थापन केल्या. गाडगे महाराज गोधडे महाराज म्हणून ओळखले जात होते. १९३२ - ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी सुरू केले.. . गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.त्यांचे जीवनावर देवकीनंदन गोपाला हा चित्रपटही निघाला आहे. यातील "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला" हे गीत मन्ना डे यांनी गायले. आचार्य अत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणतात 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात' १९३१ वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली. १९५४- गाडगेबाबांनी मुंबईत जे.जे. हॉस्पिटलच्या रोग्यांच्या नातेवाइकांना उतरण्यासाठी हॉस्पिटलजवळ धर्मशाळा बांधली. गाडगेबाबांनी डॉ. पंजाबराव देशमुख, व कर्मवीर भाऊराव पाटील यांना त्यांच्या कार्यात मदत केली होती. डॉ आंबेडकर त्यांना गुरुस्थानी मानत असत.

<u>संत गाडगेबाबा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर :</u>

१४ जुलै १९४१ ला गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. महानंदसामी नावाच्या त्यांच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या डॉ. आंबेडकरांना गाडगे बाबांची खबर दिली. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदेमंत्री होते. आणि त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. बाबांचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली. २ घोंगड्या विकत घेऊन ते महानंदसामीसह रुग्णालयात गेले. कोणाकडून काही न घेणाऱ्या बाबांनी बाबासाहेबांकडून २ घोंगड्या स्वीकारल्या. पण म्हणाले "डॉ. तुम्ही कशाला आले? मी एक फकीर. तुमचे एक मिनिट महत्त्वाचे आहे. तुमचा किती मोठा अधिकार आहे." तेव्हा बाबासाहेब म्हणाले "बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा. उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे." या प्रसंगी बाबासाहेबांच्या डोळ्यात अश्रू होते. कारण असा प्रसंग पुन्हा जीवनात येणार नाही हे दोघेही जाणत होते.

<u>गाडगेबाबांचे विचार :</u>

एकदा गाडगेबाबा रस्त्याने जात असताना समोर एक व्यक्ती दगडाची पूजा करत असताना त्यांना दिसली. त्याने दगडावर हार चढविला. दुधाने अंघोळ घातली. इतक्यात एक कुत्रा आला आणि मागील पाय वर करून त्या दगडावर मूत्र विसर्जन करू लागला. ती व्यक्ती चिडली. त्याला कुत्र्याचा फार राग आला. तो कुत्र्याला मारण्यासाठी हातात दगड घेऊन धावू लागला. तेव्हा गाडगेबाबा म्हणाले, " बिचाऱ्या गरीब मुक्या जनावरांना त्रास का देता ? त्याला हे कुठं माहीत आहे की, माणसांचा देव दगड असतो म्हणून?" पंढरपुरात एकदा टिळकाचे भाषण होते. तेवढ्यात बाबा समोरून येत होते. सगळ्यांच्या माना वळल्या. श्रोत्यांच्या मनातले ओळखून टिळकांनी बाबांना स्टेजवर आणले आणि दोन शब्द बोलायला सांगितले. टिळकांचे अथणीला झालेले भाषण बाबांना ठाऊक होते.. स्टेजवर येताच बाबांनी टिळकांच्या ब्राह्मण पंथाला शब्दांनी झाडायला सुरुवात केली. बाबा म्हणाले "टिळक महाराज मी चुकलो. आम्ही हयातभर तुमची कापडं धुतली, इस्त्री केली. तवा आम्ही कसे मार्गदर्शन करू? महाराज काय बी करा पण आम्हालाबी ब्राह्मण करा." संत व सुधारक या दोन्हीही वृत्ती गाडगेमहाराजांत होत्या. तुकारामांप्रमाणे ठणकावून् सत्य सांगण्याचे धैर्य बाबांमध्ये होते. जनसंपर्क होता. समाजाचा अर्धा भाग जो स्त्रिया व अतिशूद्र या सर्वांना व सुशिक्षित समाजथरातील जे येतील अशा स्त्रीपुरुषांना एकत्र बसवून, म्हणजे भेदाभेद, स्पृश्यास्पृश्यता संपूर्ण बाजूस घालवून हरिभक्तीचा रस चाखण्यास सर्व वर्गातील, सर्व थरातील बायाबापडी, श्रीमंत व गरीब वगैरे सर्व एकत्र होत. बाबांची कीर्तने एकल्यानंतर तुकाराम व जोतीबाची शिकवण लोकांप्रत वाहात आहे, असे दिसते.

<u>कीर्तन आणि खराटा (झाडू)</u>

बाबांच्या कार्यप्रणालीमध्ये खराटा आणि कीर्तन या दोन्ही गोष्टी निर्णायक ठरल्या. अवती भवतीच्या दुषित वातावरणामुळे गढूळ झालेल्या लोकगंगेचे शुध्दिकरण करण्यासाठी कीर्तन आणि खराटा हे प्रभावी साधन ठरले. कथनी आणि करनी यातील समतोल बाबांनी कीर्तन खराट्याच्या माध्यमातून साधला. बाबांच्या सेवाकार्याची सुरुवातच मुळात खराट्यापासुन झाली. खराटा आणि कीर्तन या दोन्ही गोष्ठी प्रतीकांच्या स्वरुपात विचारात

घेतल्यास खराटा हे श्रमाचे व कीर्तन हे ज्ञानाचे प्रतीक ठरते. श्रम आणि ज्ञान हे माणसाच्या उन्नतीसाठी महत्वपुर्ण ठरणारे आहे. श्रमानंतरच ज्ञानाचा क्रम येतो. याप्रमाणे बाबा एखाद्या गावात गेल्यानंतर प्रथम हातामध्ये खराटा घेऊन ग्रामसफाई करीत. अनेक रोगांची जननी ठरणारी घाण नाहीशी झाल्याशिवाय निरोगी जीवन वाट्याला येऊ शकत नाही हे तत्व बाबांनी जाणले व त्याची प्रचिती हातात खराटा घेऊन प्रत्यक्ष कर्माद्वारे विश्वाला दिली. बाबांचा खराटा धर्म हा ग्रामोध्दाराचा महामंत्र ठरला. लोकांनी खराट्याला अक्षरशः डोक्यावर घेतले आणि गावोगांवी बाबांच्या प्रेरणेने स्वच्छता मोहिम राबविली. बाबाच्या हातातील खराटा हा शेवटपर्यत त्यांच्या सोबत होता. स्वच्छतेचे महत्व प्रतिपादित करणारा बाबांचा खराटा प्रबोधनाचे प्रभावी साधन ठरले होते.

स्वच्छतेचे तत्व कायम ठेवुन खराट्यासोबतच कीर्तनाचा वापर करीत शतकानुशतके लोकांच्या डोक्यामध्ये साचलेली घाण स्वच्छ करण्याचे कार्य बाबांनी केले. जनजागृतीसाठी जास्तीत जास्त लोकांपर्यत पोचण्यास कीर्तन हे प्रभावी माध्यम आहे. याची जाण बाबांना होती. त्यानुसारच त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातुन तळागाळातील जनसमुहाला जगण्याचे व्यवहार तत्वज्ञान दिले. परंपरेला छेद देत नव्या स्वरुपात अवतरलेले बांबाचे कीर्तन ज्ञानी-अज्ञानी, गरीब-श्रीमंत, लहान-मोठे, आस्तिक-नास्तिक सर्वासाठी आनंददायी पर्वनी ठरले. अंधश्रध्दा निर्मुलन, व्यसनमुक्ती शिक्षणाचे महत्व, काटसर, भुतदया, अस्पश्यता निवारण, देव-धर्म इत्यादी संदर्भातील मौलिक विचार मांडले.

ग्रामस्वच्छताः

संत गाडगे बाबा स्वच्छतेला जास्त महत्व देत. ज्या गावामध्ये त्यांचा मुक्काम असे त्या मुक्कामाच्या ठिकाणच्या आसपासची स्वच्छता ते करत, एखाद्या मंदिरामध्ये ते थांबले तर ते मंदिर झाडून -पुसुन चक्क करत. गावामध्ये पाणवठ्यावर असणारी घाणही साफ करायचे. हातातील खराटा आणि गाडगेबाबा यांचे एक दृढ समीकरणच तयार झाले होते. निरपेक्षपणे कुठलाही मोबदला न घेता सुरु असणारे त्यांचे कार्य जनसामान्यासाठी प्रेरणादायक ठरत होते. अप्रत्यक्षपणे कुठलाही मोबदला न घेता सुरु असणारे त्यांचे कार्यजनसामान्यसाठी प्रेरणादायक ठरत होते. अप्रत्यक्षपणे स्वच्छतेचे महत्वच त्यांच्या

कार्यामधुन लोकामध्ये निर्माण होत होते. एखाद्या गावामध्ये कीर्तनाचा बेत असल्यास मंदिराच्या समोरीत पटांगण ते झाडून स्वच्छ करत व हा क्रम त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत जपला याच स्वच्छता मोहीमेच्या माध्यमातुन लोक प्रत्यक्ष त्यांच्या कार्यामध्ये सहभागी होत. कधी गंमत म्हणुन तर कधी गावाकीचे काम समजुन लोक हातात खराटा घेवुन बाबांच्या सोबत कार्य करत असत स्वच्छतेचे महत्व नव्हे तर स्वच्छतेचा धर्मच त्यांनी जनसामाण्यामंध्ये रुजविला .

दुस-याच्या दुखामध्ये सहभागी होण्याची त्यांची मुळचीच प्रवृत्ती होती. भ्रमंती काळामध्ये सतत भटकंती सुरु असायची. या काळामध्ये त्यांच्या प्रकृती धर्माला अनुसरुन जेथे शक्य होईल तेथे स्वतःपुढाकार घेवुन बाबा इतरांच्या मदतीला जात. पांडूरंगजी कवडे व प्रबोधनकार ठाकरे यांच्या लेखनामध्ये त्याचे स्वरुप स्पष्ट झाले आहे. उपरोक्त चरित्र लेखकांच्या लेखनामधुन सांगितल्यानुसार झिंगराजीचा व्यवसाय परिटाचा होता. वाईट संगतीमुळे झिगराजींना दारुचे व्यसन जडले. सखुबाई आपल्या गरीबीचा संसार चालविण्यासाठी शेतमजुरी करुन दोन पैसे कमवित होत्या. दारुच्या व्यसनामुळे झिंगराजींचा १८८४ मध्ये मुत्यू झाला. मरणाच्या पुर्वी झिंगराजी यांनी सखुबाई यांना डेबुजीले सांभाळजो बर ? तो पिसाट देवाले न मानणारा झाला तरी बरं होईल पण त्याने बकरे खाऊ अन दारु पिऊ, देवांचा नाद लागू देऊ नको बर ? असा सल्ला दिला होता.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानः

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविणे सुरु केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ, सुंदर व पर्यावरणयुक्त देशाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी राज्यात मोठ्र्या प्रमाणावर हे अभियान राबविण्यस सुरुवात झाली आहे.

या अभियानास वाढता प्रतिसाद मिळत आहे. घर स्वच्छ राहिले तर गाव स्वच्छ राहील. शहर स्वच्छ राहील. शहर स्वच्छ राहिले तर राज्य स्वच्छ राहील, पर्यायाने देशही स्वच्छ राहील. स्वच्छतेमुळे देशाचे आरोग्यही स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे.

त्यामुळेच पंतप्रधानानी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत देश स्वच्छ करण्याचा संकल्प स्वच्छ भारत अभियानातून मांडला आहे. त्यांचा हा संकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी महाराष्ट्राचा हातभारही मोठ्रया प्रमाणत लागत आहे. पंतप्रधानांच्या स्वच्छ भारत संकल्पाला आता महाराष्ट्राने आणखी व्यापक स्वरुप देण्याचे ठरविले आहे. त्यातुनच आता राज्यातील नागरी भागात स्वच्छ महाराष्ट्रात अभियान (नागरी) राबविण्यास सुरुवात होणार आहे. येत्या पाच वर्षात भारत हा स्वच्छ देश म्हणुन ओळखला जावा, यासाठी केंद्राने राबविलेली योजना महत्वपुर्ण आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी राज्याचा हातभारही लागणे आवश्यक आहे. त्यासाठीच महाराष्ट्र शासनाने नागरी भागातील स्वच्छतेवर लक्ष केंद्रीत केले आहे. यापुर्वी महाराष्ट्रात संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून यादृष्टीने व्यापक प्रयत्न करण्यात आले आहेत यापुढील काळातही या अभियानाची व्याप्ती वाढवून संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ आणि सुंदर बनविण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान हे त्यातलेच एक पाऊल आहे.

<u>पार्श्वभूमीः</u>

सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लाख २७ हजार ५३१ (राज्याच्या एकुण लोकसंखेच्या ४५.२३ टक्के) एवढी आहे. नागरी भागातील एकुण कुटूंबाची संख्या एक कोटी, ८ लाख १३ हजार ९२८ एवढी आहे. त्यापैकी साधारण २९ टक्के कुटूंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटूंबे उघडयावर शौचालयास जात आहेत. राज्यात २६ महानगरपालिका व २३९ नगर परिषदा अशा एकुण २६५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था असुन या सर्व नागरी स्थानिक संस्थांमधुन दरदिवशी निर्माण होणा-या घनकच-याची आधुनिक व शास्त्रशुध्द पध्दतीचा अवलंब करुन फारच थोड्या शहरामध्ये विल्हेवाट लावली जात आहे. त्यामुळे संबंधित महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणविषयक व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. या घनकच-याची योग्य व शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब करुन विल्हेवाट लावण्याबाबत योजना तयार करण्या बाबत राज्य शासनाने महानगरपालिका तसेच नगरपालिकांना आदेश दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या

स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यांमधील सर्व शहरांमधील उघड्यावर शौचालयास जात असलेल्या कुटूंबांना शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी व शहरांमधील घनकच-यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्यामध्ये नागरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसारच नगरविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत हे अभियान २ ऑक्टोबर २०१९ पर्यत राबविण्यात आले आहे.

<u>संशोधन विषयाचे महत्वः</u>

सामाजिक संशोधन हे सामाजिक घटनांचे अध्ययन आहे. त्यामुळे सामाजाचा विकास होण्यासाठी त्यांची मदत होते. सत्याचे संशोधन केल्यामुळे ज्ञानप्राप्ती होते. आणि त्याचा समाजाला अत्यंत उपयोग होतो. संशोधनामुळे समाजातील दुश्यवृत्तीची आणि त्यांच्या दुष्परिणामांची जाणीव होते. म्हणुन सामाजीक संशोधनाची व्यवहारीक उपयुक्तता आहे. माहित नसलेल्या बाबी माहित करुन घेण्यातच संशोधकाला एक वेगळा आनंद मिळत असतो. हे ज्ञान कितपत उपयुक्त ठरेल हा विचार संशोधकांसाठी अत्यंत गौण असतो. सामाजिक संशोधनामुळे सामाजिक जीवनातील अनेक रहस्यांचा उलगडा होतो. आणि सामाजीक वास्तविकतेसंबंधीचे आपले ज्ञान विकसीत होत जाते.

विद्‌यमान ज्ञानसंग्रहात भर घालने हे सामाजिक संशोधनाचे सर्वात महत्वाचे कार्य आहे. तसेच मनातील साचेबंध ज्ञानाची जळमटे दुर करुन व्यवहारिक सिध्दांत दुर करणे हे सुध्दा संशोधनाचे तितकेच महत्वपूर्ण कार्य आहे. संशोधन ही एक संचयी प्रकीया आहे. सामाजिक शास्त्राच्या संदर्भात ती एक विसर्जन प्रक्रिया सुध्दा आहे. केवळ ज्ञानात भरत पडल्यानेच आकलन वाढते असे नसुन प्रस्थापित गैरसमजुतींचा त्याग केल्यानेही आकलन वाढत असते.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून संत गाडगे बाबांचे समतावादी आधुनिक विचार सर्वसामान्यापर्यत पोहचविण्यासाठी मदत होईल तसेच ग्रामीण भागातील अंधश्रध्दा

निर्मुलनासाठी शासनाला व ग्रामीण भागातील जनतेला या संशोधनाचा उपयोग होईल. शहरी व ग्रामीण भागातील स्वच्छतेचे महत्व जनतेला समजण्यास मदत होईल.

१.कीर्तनाचे माध्यम हे ग्राणीण भागातील प्रबोधनासाठी महत्वपुर्ण लोकमाध्यम आहे.

२.कीर्तनामुळे आध्यात्माची चळवळ गतीमान करता येते.

३.समाजामध्ये वैचारीक व भावनीक अदान, प्रदान करुन समाजात सामजस्य, आणि सौहार्द प्रस्तापित करण्यासाठी कीर्तनाची भुमिका महत्वपुर्ण ठरते.

याबद्दल संत गाडगे बाबांनी कडाडून हल्ला केला. धर्माचा नावावर होणा-या हिंसा बंदीचे कार्य भारतात मोठ्या प्रमाणावर श्री गाडगे बाबांनीच केले. महाराष्ट्रात भरणा-या बहुतेक ग्राणीण यात्रेतुन देवाच्या नावावर होणारी हिंसा बंद करण्यासाठी प्रबोधन केले.

परंपरेच्या ठराविक चाकोरी बाहेरचे नव्या विचारांचे तत्वज्ञान बहुजन समाजाच्या गळी उतरवणे फार मोठे कठीण काम मोठमोठ्या धर्म पंथ संस्थापकांना ही जमले नाही ते काम गाडगे बाबांनी केले. पट्टीच्या शहरी पंडीतांना आजवर जे साध्य झाले नाही ते संत गाडगे बांबांनी करुन दाखवले आहे.

<u>संशोधनाचा उद्देशः</u>

१. ग्रामस्वच्छतेच्या दृष्टीकोणाचा आढावा घेणे.

२. संत गाडगे बाबांच्या जिवन चरीत्राचा अभ्यास करणे.

३. संत गाडगेबाबांच्या किर्तनातील ग्रामस्वच्छेतेचा आढावा घेणे.

४. किर्तनातून साधलेला ग्रामस्वच्छतेच्या संदेशाचा चिकित्सक अभ्यास करणे.

५. संत गाडगे बाबांच्या विज्ञानवादी विचाराचा आढावा घेणे.

<u>गृहीतकृत्येः</u>

१. संत गाडगे बाबांच्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधन घडून आले.

२. संत गाडगेबाबांच्या कीर्तनामुळे स्वच्छता निर्माण होण्यास मदत झाली.

३. संत गाडगे बाबांचे विचार विज्ञानवादी होते.

४. ग्रामस्वच्छतेमुळे आरोग्याची सुधारण्या होण्यास मदत होते.

<u>संशोधन आराखडाः</u>

प्रस्तूत संशोधनात ग्रामस्वच्छता व संत गाडगे बाबांच्या कीर्तनाचा संवाद शास्त्रीय अभ्यास होईल.

संशोधन पध्दतीः

<u>तथ्थे माहिती संकलन साधनेः</u>

माहिती संकलीत करण्यासाठी संशोधकाने दोन साधनाचा प्राथमिक व दुय्यम वापर केला आहे.

<u>प्राथमिक माहिती संकलन साधनेः</u>

संशोधकाने संशोधन करण्यासाठी प्राथमिक माहिती म्हणुन संपूर्ण महाराष्टातुन १०० कीर्तन भक्तांच्या मुलाखती स्वरुपात माहिती संकलीत केली आहे.

संशोधकाने नमुना निवडीमध्ये उदेशपुर्ण नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला त्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून १०० प्रश्नांवली मार्फत माहिती संकलीत करण्यात आली.

उत्तरदात्याकडून मुलाखत / अनुसुचीच्या माध्यमातुळन तथ्थ गोळा केले आहे.

<u>नमुना निवडः</u>

<u>दुय्यम माहिती संकलन साधनेः</u>

दुय्यम माहिती संकलन साधनामध्ये संशोधकाने वेगवेगळी ग्रंथ महाराष्ट्र शासन प्रकाशीत ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, या व्यक्तीरिक्त छापील आणि अछापील व संकेतस्थळे साधनांचा संशोधनासाठी वापर करण्यात आला.

<u>संशोधनाच्या पध्दतीः</u>

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन कर्त्याने विवेचनात्मक विश्लेषणान्मक सर्वेक्षणात्मक, तसेच प्रश्नावली या संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामुग्रीच्या आधारे माहिती संकलीत केलेली आहे.

<u>तथ्यांचे विश्लेषणः</u>

प्रस्तूत संशोधन कार्यात संशोधकाने तथ्थ संकलन करुन त्यांच्या विश्लेषासाठी सांख्यीकी साधनांचा वापर करुन सरासरी टक्केवारी द्वारे माहितीचे सादरीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. योग्य त्या ठिकाणी तक्ते, आलेख, आराखडे, आकृत्या व चित्रे यांचा वापर करण्यात आला आहे.

<u>विषयाची व्याप्ती व मर्यादाः</u>

अलीकडच्या काळात नव्हे तर मानवी सभ्यतेच्या प्रारंभापासून माणुस आपल्या संभोवतालच्या परिस्थीतीकडे जिज्ञासु आणि चिकित्सक वृतीने पाहत असतो. परंतू त्यांच्या बौध्दीक क्षमतेला काही मर्यादा असतात. संशोधनाच्या विषयाची निवड केल्यानंतर वेळ पैसा आणि श्रेय यांचे नियोजन करावे लागते. तरचं संशोधकाला योग्य दिशा मिळुन निश्चित कालावधीत संशोधन पूर्ण करता येते. हे लक्षात घेऊन मी माझ्या विषयाची मर्यादा कीर्तन व ग्राम स्वच्छता लोकमाध्यमा पुरती मर्यादित केली आहे. आणि त्यांची व्याप्ती जनसंवाद या विषयापुरती मर्यादित आहे.

<u>प्रकरण रुपरेषाः</u>

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:	संदर्भ साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती
प्रकरण तिसरे	:	संत गाडगे बाबा यांचा जीवन परीचय
प्रकरण चौथे	:	ग्रामस्वच्छतेची भूमिका
प्रकरण पाचवे	:	संत गाडगे बाबाचे ग्रामस्वच्छतेसाठी गाजलेली किर्तने
प्रकरण सहावे	:	निष्कर्ष / सारांश

संदर्भग्रंथ सुची

परिशिष्ट्ये

संदर्भग्रंथ सुचीः

१. प्रा.डॉ.टी.सी.गेडाम, संत गाडगे बाबा जीवन दर्शन, प्रबुध्द भारत पुस्तकालय औरंगाबाद प्रकाशन व्यवसाय नागपूर

२. प्रबोधनकार के.सी.ठाकरे, संत गाडगे बाबा, प्रबुध्द भारत पुस्तकालय औरंगाबाद प्रकाशन व्यवसाय नागपूर

३. ह.भ.प.भार्गवराव अनंत घेसास, कीर्तन कला, मनोरमा प्रकाशन पुणे

४. डॉ.साहेब खंदारे, लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग प्रतिमा प्रकाशन पुणे.

५. मधुकर केचे, श्री संत गाडगे महाराज, साकेत प्रकाशन प्रा.लि.औरंगाबाद.

६. प्राचार्य रा.तु.भगत लोकसंत गाडगे महाराज सिध्दराज प्रकाशन, कागज पुणे.

७. प्रा.विलास खरात, आमचा शत्रू बामन, मारवाडी बनिया भाटे (गाडगे महाराजांचे शेवटचे भाषण) मुलनिवासी पब्लीकेशन ट्रस्ट, पुणे.

८. WWW.google.com

संशोधन विद्यार्थी	**मार्गदर्शक**
गिमेकर मनोजकुमार पंढरीनाथ	**प्रा.डॉ.दीपक शिंदे**